दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बातम्या व जाहीरातीसाठी संपर्क 8421577797

बीड महाराष्ट्र | बुधवार | 4 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 257 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# तळेगाव येथे बीड रोडवर नव्याने अत्याधुनिक होत असलेल्या नायरा पेट्रोलियम` संचलित `वक्रतुण्ड पेट्रोलियम` या नवीन पेट्रोल पंपाचा आज होणार शुभारंभ




## नामदार पंकजाताई मुंडे, आमदार धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख राहणार उपस्थिती



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

**परळी वैजनाथ -तेलगाव- वडवणी- बीड राष्ट्रीय महामार्ग ३६१ एफ या महामार्गावर श्री गजानन एक्सट्रॅक्शन समोर वक्रतुण्ड पेट्रोलियम` या नवीन पेट्रोल पंपाचे बुधवार दिनांक 04 फेब्रुवारी रोजी सकाळी 11:00 वाजता ना. पंकजाताई मुंडे, आ.धनंजय मुंडे यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ होणार आहे. तरीशुभारंभ सोहळ्याला परळी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन" सूर्यभान (नाना) मुंडे आणि समस्त मुंडे परिवार,तळेगाव यांनी केले आहे.**

प्रभु वैद्यनाथांच्या कृपेने परळी वैजनाथ - तेलगाव- वडवणी-बीड राष्ट्रीय महामार्ग 361 एफ या महामार्गावर तळेगाव पांगरी (गोपीनाथ गाड) जावळ श्री गजानन एक्सट्रॅक्शन समोर साकारतोय तुमचा प्रवास... आमचा विश्वास !, नायरा पेट्रोलियमच्या विश्वासार्हतेसह, अत्याधुनिक पेट्रोल पंप आता तुमच्या सेवेत ! वक्रतुण्ड पेट्रोलियम, उच्च दर्जाचे इंधन, २४ तास सेवा, आणि हसतमुख कर्मचारी वर्ग... `नायरा पेट्रोलियम` संचलित `वक्रतुण्ड पेट्रोलियम` हा नविन पेट्रोल पंप होत



आहे. बुधवार दिनांक 04 फेब्रुवारी रोजी सकाळी 11:00 वाजता ना. पंकजाताई मुंडे, मंत्री-पर्यावरण व पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, आ.श्री.धनंजयजी मुंडे,माजी मंत्री-महाराष्ट्र राज्य तर प्रमुख उपस्थिती सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी,नगराध्यक्ष नगर परिषद, परळी वैजनाथ, श्री. संजयभाऊ दौंड, माजी आमदार, अजय मुंडे, माजी जिल्हा परिषद गटनेते, बीड,अरविंद लाटकर उपविभागीय अधिकारी, परळी वैजनाथ, श्री. व्यंकटेश मुंडे तहसीलदार-परळी वैजनाथ, श्री. रीतेश जैन स्टेट हेड-महाराष्ट्र, श्री. निलेश शेलार टेरिटरी मॅनेजर-अहिल्यानगर,श्री. विभोर अग्रवाल, डिव्हिजनल मॅनेजर पुणे, श्री. अभिषेक घोष टेरिटरी मॅनेजर-बीड, श्री.अमित सोळंके, वरिष्ठ व्यवस्थापक-बीड, श्री. सतिश पाटील सहाय्यक व्यवस्थापक-बीड व विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये शुभारंभ होणार आहे. शुभारंभ सोहळ्याला परळी वैजनाथ व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन रुक्षराज हनुमंतराव मुंडे, सुभाष हनुमंतराव मुंडे, सुर्यभान (नाना) हनुमंतराव मुंडे सभापती-कृ.उ.बा. समिती, परळी वैजनाथ यांनी केले आहे.

## वक्रतुण्ड पेट्रोलियम' या नवीन पेट्रोल पंपाचा आज होणार शुभारंभ कार्यक्रमास मोठ्या संखेने उपस्थित राहावे - सभापती सूर्यभान नाना मुंडे



## परळीतील छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील मुख्य रस्त्यावर पडलेला प्रचंड मोठा खड्डा बुजवावा; नागरिकांची मागणी

### प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिक हैराण

### परळीतील विद्यार्थी, वाहनचालक, भाविक त्रस्त; प्रशासन अजूनही झोपेत

### महाशिवरात्रीपूर्वी छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील खड्डे तात्काळ बुजवावेत : बालाजी चाटे

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)



परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील मुख्य रस्त्यावर पडलेला प्रचंड मोठा खड्डा अद्यापही बुजविण्यात आलेला नाही. या खड्ड्यामुळे दररोज नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी व भाविकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून प्रशासन मात्र डोळेझाक करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. महाशिवरात्रीपूर्वी छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील खड्डे तात्काळ बुजवावेत अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बालाजी चाटे यांनी दिला आहे.

हा रस्ता दोन ते तीन जिल्ह्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून या मार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. तरीही इतक्या वर्दळीच्या रस्त्यावर महिनोन्महिने खड्डा तसाच राहणे ही प्रशासनाची घोर निष्काळजीपणा व बेजबाबदारपणाचे जिवंत उदाहरण आहे. अपघात घडण्याची वाट प्रशासन पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

या परिसरात नामांकित इंग्लिश व मराठी माध्यमांच्या शाळा तसेच महाविद्यालये आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. विशेषतः फेब्रुवारी व मार्च महिन्यात दहावी व बारावीच्या महत्त्वाच्या परीक्षा होणार आहेत. खराब रस्त्यांमुळे विद्यार्थ्यांचा वेळ, आरोग्य आणि मानसिक तणाव वाढत असून याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न प्रशासनाला विचारावा लागेल.

याहून गंभीर बाब म्हणजे, या परिसरातील रस्ता नेमका कुणाच्या अखत्यारित येतो याचाच ताळमेळ प्रशासनाला लागत नाही. नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग की राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यामध्ये जबाबदारी झटकण्याचा खेळ सुरू आहे. मात्र रस्ता खराब असल्याचे दुष्परिणाम मात्र सामान्य नागरिकांना भोगावे लागत आहेत.

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलावरून खाली उतरताना शिवाजीनगरकडे जाताना लागणारा खड्डा हा अपघातांना खुले आमंत्रण देणारा ठरत आहे. या ठिकाणी अनेक अपघात घडूनही प्रशासनाला जाग येत नाही, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

तसेच छत्रपती संभाजी चौक ते लोकनेते गोपीनाथराव मुंडे चौक (बीड–संगम रोड) दरम्यानचा ५०० ते ७०० मीटरचा रस्ता गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. या रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

लवकरच महाशिवरात्री निमित्त देशभरातून लाखो भाविक परळी येथील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणार आहेत. अशा वेळी शहरातील रस्त्यांची ही अवस्था परळी शहराची प्रतिमा मलीन करणारी आहे. प्रशासनाने तात्काळ सर्व खड्डे बुजवावेत, रस्त्याचे काम सुरू करावे व नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे; अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यास भाग पडतील, असा इशारा बालाजी चाटे यांनी दिला आहे.




# ना. पंकजाताई मुंडे यांच्या लातूर जिल्हयात झंझावाती प्रचार सभा

## केंद्र व राज्याप्रमाणेच जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता आणा

## किनगाव, जळकोट, जानवळमध्ये जोरदार सभा; हेलिकॉप्टर बिघाडामुळे उशीर, तरीही तुफान गर्दी

लातूर | प्रतिनिधी

केंद्र व राज्या प्रमाणे लातूर जिल्हा परिषदेतही भाजपची सत्ता असायला हवी. भाजप हा ग्रामीण भागाच्या विकासाला आणि सर्व सामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य देणारा पक्ष आहे, त्यामुळे येत्या ७ तारखेला भाजप महायुतीचे उमेदवार मोठया मताधिक्याने विजयी करा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज जाहीर सभांमधून बोलतांना केले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या आज लातूर जिल्हयातील किनगाव, जळकोट, जानवळ येथे जोरदार सभा झाल्या. या तीनही ठिकाणी सभेला तुफान गर्दी होती. सभेस संबोधित करताना पंकजाताई म्हणाल्या, अहमदपूर-चाकूर मतदारसंघ आणि परिसरावर लोकनेते मुंडे साहेबांनी खूप प्रेम केले आहे, मी सुध्दा या भागाच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले आहे. ग्रामविकास मंत्री असताना जलसंधारणाची कामे, ग्रामपंचायत कार्यालय, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आदी असंख्य योजना राबवून कोटयवधीचा निधी आणला. बीड परळीसारखेच प्रेम दिले. आता राज्यात महायुतीचे सरकार आहे, अजितदादा अर्थमंत्री होते, त्यांच्या अकाली जाण्याचा धक्का आम्हा सर्वांना बसला आहे, आता सुनेत्रा ताई व आम्ही सर्व जण या भागाच्या विकासाला कुठे कमी पडणार नाहीत.

### जिल्हा परिषदेत सत्ता आणा

**ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी केंद्र व राज्यात जशी भाजपची सत्ता आहे तशी सत्ता जिल्हा परिषदेत आणावी लागेल, त्यासाठी आमच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्य द्या असं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ग्रामीण जनतेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे, अनेक योजना त्यासाठी आणल्या आहेत तर दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवून महिलांना सक्षम केले आहे असं सांगून इथल्या मन्याड नदीच्या पुनरुज्जीवनाचा प्रश्न मार्गी लावू असं ना. पंकजाताईंनी सांगितलं. सभेला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी आमदार गोविंदराव केंद्रे, बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, राहूल केंद्रे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.**



### उशीर होऊनही सभा जोरदार

**ना. पंकजाताई मुंडे सकाळी छत्रपती संभाजीनगर येथून हेलिकॉप्टरने लातूर जिल्हयातील सभांना निघणार होत्या परंतू तांत्रिक बिघाड झाल्याने त्यांचे हेलिकॉप्टर नियोजित वेळेपेक्षा तीन तास उशीराने टेक ऑफ झाले, परिणामी सभा देखील उशीराने सुरू झाल्या, एवढा उशीर होऊनही सर्वच सभांना मतदारांनी मोठी गर्दी केल्याचे पहायला मिळाले.**


# लग्नात मुलीना हुंड्या ऐवजी, हक्क दिला तरच कुटुंबसंस्था टिकेल

भारतीय समाजात विवाह ही केवळ दोन व्यक्तींची घटना नसून दोन कुटुंबांची, परंपरांची आणि सामाजिक अपेक्षांची सांगड असते. विशेषतः ग्रामीण समाजात लग्न म्हणजे आनंदाबरोबरच खर्च, प्रतिष्ठा आणि तुलनांचा मोठा ताण असतो. या सगळ्यात सर्वाधिक भरडली जाते ती मुलगी आणि तिचे आई–वडील. कायदे बदलले, शिक्षण वाढले; मात्र हुंडा, संपत्ती आणि हक्क यांचा गुंता आजही कायम आहे. उघडपणे "हुंडा" असा शब्द वापरला जात नसला, तरी लग्नखर्च, दागिने, वाहन, फर्निचर, मदत अशा नावाखाली तोच व्यवहार सुरू आहे. "मुलगी सुखात राहावी", "समोरचं घर सधन आहे", "आपण कमी पडायला नको" या भावनांच्या आडून वडील कर्ज काढतात, जमीन विकतात, आयुष्यभराची कमाई एका लग्नात खर्च करतात. तरीही समाधान मिळत नाही, कारण हुंडा दिला तरी अपेक्षा संपत नाहीत.

हुंडा कायद्याने गुन्हा आहे, तरीही तो संपत नाही, कारण तो कायद्याचा नव्हे तर मानसिकतेचा प्रश्न आहे. जास्त दिलं तर मुलगी सुरक्षित राहील, अशी समजूत अजूनही समाजात खोलवर रुजलेली आहे. प्रत्यक्षात हुंड्यावर उभं राहिलेलं नातं अपेक्षांवर उभं राहतं, आणि अपेक्षा कधीच संपत नाहीत. त्यामुळे हुंडा देऊन मुलीचं भविष्य सुरक्षित होत नाही; उलट असुरक्षिततेची साखळी सुरू होते. याच ठिकाणी एक मूलभूत प्रश्न उभा राहतो—हुंड्याऐवजी जर मुलीला तिचा हक्क दिला, तर चित्र बदलू शकत नाही का?

आज कायद्याने मुलींना वडिलांच्या संपत्तीत समान हक्क दिला आहे. मात्र अनेक ठिकाणी हा हक्क फक्त कागदापुरताच मर्यादित राहतो. लग्नाआधी किंवा लग्नानंतर मुलीकडून 'हक्कसोड' करून घेतली जाते—भावाला अडचण होईल, घरात वाद होतील, तुला कशाला हक्क, अशी कारणं पुढे केली जातात. खरा प्रश्न असा आहे की, हक्क घ्यायचाच नसेल तर कायद्याने दिलाच कशासाठी? हक्क म्हणजे भीक नाही; तो प्रत्यक्ष मुलीच्या नावावर असला पाहिजे. जमीन असेल तर नोंदणी, घर असेल तर हिस्सेदारी, व्यवसाय असेल तर भागीदारी—जे शक्य आहे ते स्पष्टपणे करून दिलं पाहिजे. हा वाटा तिच्या नावावर झाल्यानंतरच विवाह ठरवला पाहिजे. हक्क आधी आणि लग्न नंतर, हीच समतेची आणि सुरक्षिततेची दिशा आहे.

हक्क आधी दिला तर अनेक पातळ्यांवर बदल दिसून येतो. मुलगी आर्थिकदृष्ट्या सक्षम होते, लग्नात



**डॉ सुवर्णा कराड,**
**(प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र राज्य)**

हुंड्याची गरज उरत नाही आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे लग्न हा व्यवहार न राहता समतेवर आधारित नातं ठरतो. जेव्हा मुलीचा स्वतःचा आधार असतो, तेव्हा तिला 'जास्त देणारी' किंवा 'घेणारी' म्हणून पाहिलं जात नाही. अशा वेळी तिच्या वाट्याचा, तोलामोलाचा जोडीदार मिळण्याची शक्यता अधिक वास्तववादी ठरते. हुंड्यावर उभं राहिलेलं नातं कमकुवत असतं, तर हक्कावर उभं राहिलेलं नातं टिकाऊ असतं.

या संदर्भात नवऱ्याच्या संपत्तीत वाटा कशासाठी, हा प्रश्न संवेदनशील असला तरी टाळता येत नाही. पत्नीला कायद्याने निर्वाहाचा अधिकार आहे. या अधिकारामुळे तिला वैवाहिक आयुष्यात निवारा, देखभाल आणि गरजेचा खर्च मिळतोच; कायदा पत्नीला असुरक्षित ठेवत नाही. त्यामुळे जर मुलीला तिच्या माहेरच्या संपत्तीत समान, स्पष्ट आणि प्रत्यक्ष हक्क मिळालेला असेल, तर विवाहाच्या आधारावर नवऱ्याच्या वैयक्तिक संपत्तीत वाटा मागण्याची गरज उरत नाही. विवाह म्हणजे दोन व्यक्तींनी आयुष्य एकत्र जगण्याचा निर्णय आहे; तो एकमेकांच्या संपत्तीवर हक्क मिळवण्याचा मार्ग ठरू नये. जसा नवरा पत्नीच्या माहेरच्या संपत्तीत हक्क मागत नाही, तशीच पत्नीनेही नवऱ्याच्या वैयक्तिक संपत्तीकडे वाट्याच्या नजरेने पाहू नये. खरी समता इथेच आहे.

हक्क देऊन लगेच काढून घेण्याची पद्धत म्हणजे हक्कसोड. हा त्याग नसून दबावाखाली दिलेली संमती आहे. ज्या समाजात स्त्रीचे हक्क काढून घेतले जातात, तिथे कुटुंबसंस्था फक्त दिसते, टिकत नाही. म्हणून हक्कसोड पद्धत सामाजिकदृष्ट्या अमान्य ठरवली पाहिजे. त्याचप्रमाणे आज ग्रामीण भागातही लग्नाचा खर्च प्रचंड वाढला आहे. थाटामाट, दिखावा आणि सामाजिक स्पर्धेमुळे लग्न हा आनंदाचा क्षण न राहता आर्थिक ओझा बनतो. यातून कर्ज, ताण आणि वाद निर्माण होतात. लग्नाचा खर्च कमी असावा आणि तो दोन्ही बाजूंनी समानपणे करावा. साधं लग्न म्हणजे कमीपणा नाही; तो शहाणपणाचा निर्णय आहे.

कायदा हा समाजासाठी असतो; समाज कायद्यासाठी नसतो. कायद्याचा उद्देश अन्याय थांबवणे आणि कुटुंबसंस्थेला सुरक्षित करणे हा आहे. जर एखाद्या कायद्याच्या अंमलबजावणीतून नाती तुटत असतील, तर कायदा मोडण्याऐवजी तो सुधारण्याचा विचार समाजाने केला पाहिजे. कायदा कुटुंबसंस्था मोडण्यासाठी नसतो; तो ती न्यायाने टिकवण्यासाठी असतो. सारांश रूपाने असे म्हणता येईल की मुलगी ओझे नाही, ती हक्कदार आहे. हुंडा देऊन तिला कमजोर करू नका; हक्क तिच्या नावावर देऊन तिला सक्षम करा. हुंडा नाही, हक्क नावावर. दिखावा नाही, साधेपणा. व्यवहार नाही, समता. हा बदल कायद्याने नव्हे, तर आपल्या सामूहिक निर्णयाने घडेल. आज आपण बदललो, तर उद्या कुटुंबसंस्था वाचेल.



# श्रद्धेच्या शिलावर उभा राहणारा वाढदिवस

## मच्छिंद्रनाथ गडावरती 1 कोटी 33 लाख निधी जमा

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

ज्या दिवशी एखादा नेता आपला वाढदिवस केवळ केक, फुलं आणि शुभेच्छांपुरता मर्यादित न ठेवता समाजाच्या उन्नतीचा उत्सव बनवतो, तो दिवस इतिहासात नोंदला जातो.

असाच एक प्रेरणादायी क्षण आष्टी तालुक्याचे आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर अनुभवायला मिळाला. सामान्यतः वाढदिवस म्हणजे जल्लोष, मिरवणूक आणि सत्कारांची रेलचेल. पण आमदार सुरेश धस यांनी हा प्रवाह मोडत, साधेपणातून भव्यतेकडे नेणारा मार्ग निवडला. त्यांनी आपला वाढदिवस अत्यंत शांत, श्रद्धामय आणि अर्थपूर्ण पद्धतीने मच्छिंद्रनाथ गडावर साजरा केला. कारण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे त्यांनी आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करून मच्छिंद्रनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना एक अनोखे आणि मनाला भिडणारे आव्हान दिले. ते म्हणाले—

"माझ्या वाढदिवसासाठी फुलांची पाकळी उधळण्याऐवजी, त्या पाकळ्यांचे रूपांतर दगड-धोंड्यांत करा; कारण या दगडांतूनच मच्छिंद्रनाथ गडाचे भव्य दिव्य असे मंदिर उभे राहणार आहे. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी मंदिरासाठी कोल्हापूरची पाकळी अशी देणगी द्यावी."हे आव्हान म्हणजे जणू बीज पेरण्यासारखे होते. योग्य मातीत पेरलेले बीज जसं वटवृक्ष बनतं, तसंच हे आवाहन कार्यकर्त्यांच्या मनात रुजलं. श्रद्धा, निष्ठा आणि सामाजिक बांधिलकीच्या पाण्याने ते बीज फुललं आणि पाहता पाहता मच्छिंद्रनाथ गडावर १ कोटी ३३ लाख रुपयांचा भव्य दिव्य असा निधी जमा झाला.हा निधी केवळ पैशांचा आकडा नव्हता;तो होता लोकांचा विश्वास,तो होता श्रद्धेचा गाभा,आणि तो होता नेतृत्वावर उमललेला विश्वासाचा कळस.या उपक्रमातून एक गोष्ट स्पष्ट झाली वाढदिवस हा स्वतःसाठी आनंदाचा दिवस असू शकतो, पण तो समाजासाठी काहीतरी देण्याचा दिवस बनवता आला, तर तो चिरस्मरणीय ठरतो. आमदार सुरेश धस यांनी आपल्या कृतीतून हेच दाखवून दिले.आज मच्छिंद्रनाथ गडाच्या प्रत्येक दगडात केवळ बांधकाम नाही, तर लोकभावनेची वीण गुंफली जात आहे.आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते जिथे नेतृत्व सेवाभावाने उभे राहते, तिथे इतिहास आपोआप घडतो. मच्छिंद्रनाथ गडावरती 357 रक्तदात्यांनी रक्तदान करून वेगळाच इतिहास रचवला.

# गझल सप्ताहानिमित्त कविश्रेष्ठ श्री सुरेश भट आणि त्यांचे मित्र मंडळ

येत्या शनिवार व रविवार दि.सात व आठ फेब्रुवारी रोजी श्री सुरेश भटांच्या अमरावतीच्या मोर्शी रोडवरील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनामध्ये अखिल भारतीय एल्गार गझल साहित्य संमेलन होत आहे. त्यानिमित्त आयोजित गझल सप्ताहात कवी श्रेष्ठ व अमरावतीचे सुपुत्र श्री सुरेश भट यांचा व त्यांच्या मित्र परिवाराचा हा अल्पसा परिचय.

कविवर्य सुरेश भट आपल्या पुस्तकामध्ये कार्यक्रमामधून व प्रत्यक्ष बोलण्यामधून आपल्या मित्रांचे नेहमी कौतुक करायचे. आभार मानायचे. त्यांच्यामुळेच मी घडलो. माझ्या कवितेला माझ्या गजलेला त्यांनी खत पाणी घातले असे ते सातत्याने सांगायचे. त्यांच्या या विधानात बरेचसे सत्य आहे. मी त्यांच्या जवळ राहिल्यामुळे मला या त्यांच्या विधानाची प्रचिती येत गेली.

योगायोगाने डॉ. मोतीलाल राठी हे माझे जवळचे ज्येष्ठ मित्र असल्यामुळे व कवी श्रेष्ठ श्री सुरेश भट यांचे मित्र असल्यामुळे माझा त्यांच्या मित्रमंडळीची परिचय झाला. सुरेश भट यांचे अमरावती मधील मित्रमंडळी म्हणजे सर्वश्री अरविंद ढवळे डॉ. मोतीलाल राठी रामदासभाई श्राफ दादा इंगळे वली सिद्धीकी व प्रभाकर वैद्य.डॉ. मोतीलाल राठींमुळे व सुरेश भटांमुळे या सर्वांची माझी चांगली ओळख झाली होती. आणि ती दीर्घकाळ टिकलीपण होती. आज यांच्यापैकी फक्त प्रभाकरराव वैद्य



हयात आहेत. त्यांनी व सुरेश भटांच्या मित्रांनी ते जिवंत असताना कविवर्य सुरेश भटांची जी देखभाल केली त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले ते निश्चितच नोंद करण्यासारखे आहे.कविवर्य सुरेश भट अमरावती बडनेरा रोड वरील गोपाल नगर परिसरातील भटवाडी या परिसरात शरणम या निवासस्थानी राहत होते. पण त्यांचा जास्त वावर होता तो त्यांच्या मित्रमंडळीमध्येच. आईचे प्रोत्साहन भाऊ दिलीप रांवाची साथ आणि मित्रमंडळीचे प्रेम यामुळे सुरेश भटांची कविता गझल ही फुलत गेली आणि तिने संपूर्ण महाराष्ट्र काबीज केला.

श्री अरविंद ढवळे हे सुरेश भटांचे जिवलग मित्र. सुरुवातीला ते अमरावतीच्या रेल्वे स्टेशन जवळील खापर्डे गार्डनमध्ये दैनिक हिंदुस्थानच्या समोर राहत होते .पुढे गाडगे नगर व नंतर कॅम्पमध्ये मांगीलाल प्लॉटमध्ये राहावयास गेले. सुरेश भटांच्या गजलेला मनापासून दाद देणारा व त्यांच्या चुका काढणारा प्रसंगी त्यांना दाटणारा माणूस म्हणजे अरविंद ढवळे. हा माणूस खरा रसिक होता. यांनी व त्यांच्या पत्नी मीनाताई यांनी खऱ्या अर्थाने सुरेश भटांच्या सांभाळ केला. सुरेश भटांचे अमरावतीचे हक्काचे ठिकाण म्हणजे अरविंद ढवळे यांचे घर. या घराचे ते एक घटक होऊन बसले होते. ढवळे परिवाराने सुरेश भटांवर हृदयापासून प्रेम केले. त्यांच्या आवडीनिवडी जपल्या. मीनावहिनींनी कधीही तक्रार केली नाही. खरं म्हणजे या घरात भट साहेब लाडात वाढले. या कुटुंबाला फक्त भट साहेबांना सांभाळायचे होते असे नाही तर भट साहेबांना भेटायला येणारे कवी रसिक नागरिक यांना सांभाळण्याचे काम या परिवाराने केले. ढवळे परिवार हा दिलदार परिवार आहे. येणाऱ्याला जाणाऱ्याला अल्पोपहार व चहा या कुटुंबाचा शिरस्ता आहे. तो आजही कायम आहे.

वली सिद्धीकी हे अमरावतीच्या जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत म्हणजे सायन्स कोअरमध्ये अध्यापक म्हणून कार्यरत होते. या मुस्लिम कुटुंबात सुरेश भटांचे घरोब्याचे संबंध होते. सुरेश भटांची उर्दू व पर्शियनची गोडी निर्माण झाली ती याच घरात. वली सिद्दिकी हे व्यक्तिमत्व रसिक व्यक्तिमत्व होते. सुरेश भटांचे व त्याचे नाते अतिशय जवळचे होते. वली सिद्दिकी आणि सुरेश भट एकमेकांना जेव्हा भेटायचे तेव्हा उचंबळून भेटायचे. एक वेळची गोष्ट आहे. आम्ही वली सिद्दीकी यांच्या घरी मुक्कामी होतो .तो दिवस शुक्रवारचा होता. दुसऱ्या दिवशी शनिवार असल्यामुळे सकाळची शाळा होती. सुरेश भटांच्या गप्पा संपत नव्हत्या.

वली सिद्दिकी त्यांना वारंवार सांगत होते की सुरेश मेरी कल सवेरे की स्कूल है .मुझे सबेरे जाना है .मुझे नींद आ रही है. सुरेश भट काही ऐकायला तयार नव्हते . शेवटी वली सिद्दिकी म्हणाले तुमच्या गप्पा चालू ठेवा. मी झोपतो. सुरेश भट मला म्हणाले. बघ .आता गंमत बघ. मी वली सिद्धीकीला कसं जागं करतो ते. आणि सुरेश भट चक्क त्यांच्या गजला मोडून तोडून म्हणायला लागले. सुरेश भटांच्या सगळ्या गजला वली सिद्धीकीला पाठ होत्या . त्यांनी चुकीची गझल म्हटली की वली सिद्धीकी अंगावरची चादर बाहेर काढायचे .

**प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे संचालक**
**मिशन आयएएस अमरावती कॅम्प**
**9890967003**

## राष्ट्रवादीच्या काँग्रेस पार्टीच्या कल्पनाताई आघाव यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



सिरसाळा | प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला तालुकाध्यक्ष कल्पनाताई आघाव यांचा वाढदिवस सिरसाळा येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी धनगर समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते गोरख काळे यांनी कल्पनाताईंच्या सामाजिक व राजकीय कार्याचा तसेच जनसेवेचे कौतुक केले.

कल्पनाताई या गोरगरीब, सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर असतात. पक्षनिष्ठा आणि लोकांशी असलेली जिव्हाळ्याची नाळ ही त्यांची खरी ताकद आहे. अशा कार्यकर्त्या महिलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारी द्यावी, अशी मागणीही गोरख काळे यांनी यावेळी व्यक्त केली.

या यावेळी अतुल बडे, जनार्दन (बापू) किरवले व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी कल्पनाताईंना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# परळी–गंगाखेड रोडवरील पुलाचे काम ३–४ वर्षांपासून रखडलेले; छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे

## महाशिवरात्रीपूर्वी दुरुस्ती न झाल्यास भाजपाचे नगरसेवक तथा भाजपचे चिटणीस अश्विनकुमार आघाव यांनी आंदोलनाचा दिला इशारा



**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक श्री प्रभू वैद्यनाथयांच्या महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त देशभरातून लाखो भाविक परळी वैद्यनाथ येथे दर्शनासाठी येत असतात. या पार्श्वभूमीवर भाविक भक्त, वाहनधारक व स्थानिक नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी परळी वैद्यनाथ ते गंगाखेड रोडवरील रखडलेले पुलाचे काम तसेच छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरातील खड्डे तत्काळ दुरुस्त करावेत, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा भाजपाचे नगरसेवक तथा शहर चिटणीस अश्विनकुमार आघाव यांनी दिला आहे.

परळी वैद्यनाथ ते गंगाखेड हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग असून दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडणारा अत्यंत वर्दळीचा रस्ता आहे. मात्र या मार्गावरील पुलाचे काम गेल्या तीन ते चार वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पुलाचे काम रखडल्यामुळे या परिसरात अनेकदा अपघात घडले असून वाहनचालकांचे जीव धोक्यात येत आहेत. तसेच अनेकांनी अपघातामध्ये आपले प्राण गमावलेले आहेत. तरीही संबंधित यंत्रणांकडून अद्याप ठोस कार्यवाही होत नसल्याचे चित्र आहे.

याच मार्गावर असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या खड्ड्यांमुळे दुचाकी व चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढतो. रस्ता पूर्णपणे नव्याने डांबरीकरण करावा किंवा किमान खड्डे तत्काळ बुजवून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी ठाम मागणी श्री. आघाव यांनी केली आहे.

या परिसरातून औष्णिक विद्युत केंद्राकडे जाणारी वाहतूक तसेच शाळा-महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. रोज शेकडो विद्यार्थी, कर्मचारी व नागरिक या रस्त्याचा वापर करतात. रखडलेल्या पुलाच्या कामामुळे आणि खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांना उशीर होणे, वाहनांचे नुकसान होणे तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. हा प्रश्न केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून तो सार्वजनिक सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा बनला आहे.

महाशिवरात्रीच्या काळात भाविकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढते. परळी वैद्यनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्यामुळे देशभरातून भाविक येतात. अशा वेळी रस्त्यांची दुरवस्था राहिल्यास भाविकांची गैरसोय होऊन प्रशासनाची प्रतिमा मलीन होऊ शकते. त्यामुळे महाशिवरात्री सुरू होण्यापूर्वी पुलाचे काम व रस्त्यांची दुरुस्ती तातडीने सुरू करावी, अशी मागणी भाजपाचे नगरसेवक अश्विनकुमार आघाव यांनी केली आहे.

जर संबंधित विभागांनी त्वरित दखल घेतली नाही, तर भाजपाचे नगरसेवक अश्विनकुमार आघाव यांच्या वतीने शहरात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, अशी मागणीही भाजपाचे नगरसेवक अश्विनकुमार आघाव यांनी केली आहे.

# परळी नगरपालिकेने महाशिवरात्री यात्रोत्सवात व्यापाऱ्यांना अल्प करात सोयी-सुविधा पुरवाव्यात – वैजनाथ माने



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

अवघ्या काही दिवसांत महाशिवरात्री पर्वास सुरुवात होत असून, श्रीक्षेत्र ज्योतिर्लिंग परळी वैजनाथ या ठिकाणी बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रच नव्हे तर सबंध देशभरातून लाखो भाविक परळी वैजनाथ येथे दाखल होतात. महाशिवरात्रीच्या महापर्व दरम्यान श्री क्षेत्र परळीत शिवभक्तांची मांदियाळी असते. या पार्श्वभूमीवर परळी नगरीत पारंपरिक महाशिवरात्री यात्रोत्सव मोठ्या उत्साहात भरतो. या यात्रेमध्ये अनेक लघु व छोटे व्यापारी आपली दुकाने लावून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र नगरपालिकेकडून आकारण्यात येणारा कर त्यांच्या आर्थिक परिस्थितीच्या तुलनेत जास्त असल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून परळी नगरपालिका प्रशासनाने यात्रोत्सवादरम्यान व्यापाऱ्यांना अल्प करात सोयी सुविधा पुरवण्याची मागणी शिवसेनेचे शहर प्रमुख वैजनाथ माने यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.


यासंबंधी परळी वैजनाथ नगरपालिकेच्या प्रशासनास दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाशिवरात्री यात्रोत्सवात स्थानिक लघु व्यापाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे तसेच जागा भाडे, दिवाबत्ती कर, पाणी, स्वच्छता, वीजपुरवठा आदींसाठी नगरपालिकेकडून आकारण्यात येणारा कर अत्यल्प व वाजवी स्वरूपात ठेवण्यात यावा. आजपर्यंतच्या अनुभवावरून पाहता यात्रेदरम्यान व्यापारण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क अनेक छोट्या व्यावसायिकांना परवडणारे नसते. त्यामुळे अनेक व्यापारी नुकसान सहन करून व्यवसाय करतात. याचा थेट परिणाम त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेवर होतो.

यात्रोत्सवाच्या काळात व्यापाऱ्यांना आवश्यक सर्व सुविधा सुलभपणे मिळाव्यात यासाठी न.पा. प्रशासनाने "एक खिडकी योजना" राबविण्याची मागणीही शिवसेनेने केली आहे. या योजनेअंतर्गत नगरपालिका परवानगी, महावितरणकडून वीज जोडणी, पोलीस बंदोबस्त, स्वच्छता, पाणीपुरवठा यासह सर्व परवानग्या एकाच ठिकाणी आणि एकाच छताखाली उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून व्यापाऱ्यांना विविध कार्यालयांचे फेरे मारावे लागणार नाहीत.

महाशिवरात्री दरम्यान परळीत भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने सुरक्षितता, स्वच्छता आदि बाबींचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र यंत्रणा उभी करावी. शिवसेनेच्या या सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने "शिवसेना स्टाईलने" तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेचे शहर प्रमुख वैजनाथ माने, शंकर कापसे, बालाजी सातपुते, युवासेना शहर समन्वयक सुदर्शन यादव शहर संघटक सचिन सोनवणे, अभिषेक औटी, विशाल शिंदे, यशवंत शिंदे, नामदेव कांबळे, अनिकेत माने आदींनी दिला आहे.

# परळीतील विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलची आंतरराष्ट्रीय भरारी




**परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड परीक्षा 2025–26 मध्ये विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलने उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कामगिरी करत शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे.स्कुलच्या पहिल्याच वर्षात तब्बल ५८ विद्यार्थ्यांनी या आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित परीक्षेत सहभाग नोंदवत सुवर्णपदक पटकावले आहे. ही कामगिरी केवळ स्कुलसाठीच नव्हे तर संपूर्ण परळी वैद्यनाथ शहरासाठी गौरवास्पद कामगिरी ठरली आहे. इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड 2025–26 मध्ये विद्यानिकेतन स्कूलची सुवर्णकामगिरी, पहिल्याच वर्षात विद्यानिकेतन स्कूलचा मोठा विक्रम; ५८ विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय यश, परळीच्या शैक्षणिक नकाशावर विद्यानिकेतन स्कूलचा ठसा; आयएमओ परीक्षेत सुवर्ण यश मिळवले आहे.

इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड ही परीक्षा जगभरातील विद्यार्थ्यांच्या गणितीय क्षमता, तर्कशक्ती, विश्लेषणात्मक विचार आणि समस्यासोडवण्याच्या कौशल्यांची कसोटी पाहणारी अत्यंत आव्हानात्मक परीक्षा म्हणून ओळखली जाते. अशा स्पर्धेत विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांनी दाखवलेली सुवर्ण कामगिरी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता आणि मार्गदर्शनाची प्रचिती देणारी आहे.

विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलच्या ५८ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदविला होता आणि सर्व ५८ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळवण्याची अभूतपूर्व कामगिरी केली. पहिल्याच वर्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात यश मिळवणारी ही शाळा परळीच्या शैक्षणिक क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करत आहे.

विद्यानिकेतन स्कूलचे प्राचार्य संदीप मुंडे सर, शाळेचे व्यवस्थापक राकेश चांडक तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी माहिती दिली. या यशाबद्दल प्राचार्य संदीप मुंडे सर, माहिती देताना सांगितले की, "विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. योग्य मार्गदर्शन, शिस्तबद्ध अभ्यासक्रम आणि सातत्यपूर्ण सराव यामुळेच हे यश शक्य झाले आहे. आमचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख न ठेवता आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम बनवणे हे आहे."

विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूल हे आपल्या पहिल्याच वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करत आहे. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच शाळा विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजोपयोगी उपक्रम आणि स्पर्धात्मक परीक्षांचे मार्गदर्शन देत आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित होत आहेत.

विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलने मिळवलेले हे यश निश्चितच आगामी काळात अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, परळीचे नाव आंतरराष्ट्रीय शैक्षणिक पातळीवर उज्ज्वल होणार आहे. विद्यानिकेतन सीबीएससी पॅटर्न स्कूलच्या या सुवर्णयशाबद्दल शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, नगरसेवक सचिन सारडा आणि प्रणव परळीकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून, त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी विद्यानिकेतन स्कूलच्या व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षकवर्ग आणि पालकांचेही विशेष कौतुक केले आहे. आयएमओ 2025–26 परीक्षेत विद्यानिकेतन स्कूलच्या ५८ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, पहिल्याच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक यश, शिस्तबद्ध अभ्यासक्रम व योग्य मार्गदर्शनाचे फळ, परळीच्या शैक्षणिक क्षेत्रात विद्यानिकेतन स्कूलचा नावलौकिक वाढवला आहे.

# भगवान विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## स्नेहसंमेलनाकडे पालकांनी केवळ मनोरंजनांच्या दृष्टिकोनातून पाहू नये–नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी







**परळी / प्रतिनिधी**

शाळांच्या वार्षिक स्नेह संमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो म्हणून अशा संमेलनाकडे मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून पाहू नये तर मुलांचे सुप्त गुण ओळखून त्याचे करिअर घडवावे असे मत परळीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.

येथील भगवान प्राथमिक शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्धघाटन विद्येची देवता सरस्वती मातेच्या व संस्थेचे दिवंगत संस्थापक सचिव व्यंकटराव कराड यांच्या प्रतिमांचे पुजन व दिप प्रज्वलन,श्रीफळ वाढवून पद्मश्रीताई यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी व्यासपीठावरून उपस्थित पालक व विद्यार्थी यांना संबोधीत करताना पद्मश्रीताई यांनी वरील मत व्यक्त केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की,परळी शहरातील शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण वृद्धिगत करण्यासाठी परळी नगरपालिके तर्फे सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील असे आश्वासीत केले.

यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या सचिव व कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रियाताई कराड,प्रमुख अतिथी म्हणून परळी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित पाणीपुरवठा सभापती श्रीमती जयश्रीताई गीत्ते-मुंडे, बांधकाम सभापती पवनकुमार मुंडे,-शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे,नगरसेवकपती तथा सामाजिक कार्यकर्ते प्रितेशजी तोतला,शाळेचे मुख्याध्यापक लिंबाजी दहिफळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख बंडू अघाव आदिजन उपस्थित होते.

यावेळी सभापती पवनकुमार मुंडे व जयश्रीताई गीत्ते-मुंडे यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे कौतुक केले व शाळेला वेळोवेळी लागेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले व संमेलनास शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या सचिव यांनी अध्यक्षीय समारोप करताना आमच्या शाळेतून विद्यार्थ्यांना अधिकाधिक दर्जेदार शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रयत्नशील राहूत अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दहिफळे यांनी केले तर सुत्रसंचालन शिक्षक गोविंद मुंडे व शिक्षिका श्रीमती संघमित्रा वाघमारे यांनी केले तर आभार सचिन अंबाड यांनी मानले. तसेच संमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे मंत्रमुग्ध करणारे व प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे बहारदार सुत्रसंचालन शाळेतील जेष्ठ शिक्षक तथा कवी,शाहीर अनंत मुंडे व शाळेतील कर्तव्यदक्ष व कार्यकुशल शिक्षिका अंजली कुलकर्णी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक दत्तात्रय तिडके,राजेश विभूते, मंहेद्र वाघमारे,सुनील चव्हाण,सचिन गवळी, श्रीमती सिंधु सोनवणे आदिनी अथक प्रयत्न केले. विद्यार्थ्यांचे कला गुण पहाण्यासाठी पालक वर्गासह शालेय परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तब्बल चार तास कार्यक्रम उत्साहात चालला.

# परळीतील प्रभाग क्रमांक 7 मध्ये आयुष्यमान कार्ड वाटप शिबीराचे आयोजन ; 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांसाठी आयुष्यमान कार्ड : नागरिकांनी घ्यावा लाभ

**सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, नगरसेवक सचिन सेठ सारडा व नगरसेविका सौ.अश्विनी राहुल केंद्रे यांच्या पुढाकारातून हा महत्त्वपूर्ण उपक्रम**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

परळी नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक ७ मधील सर्व नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिलासादायक उपक्रम राबविण्यात येत आहे. मंगला–सारडा चॅरिटेबल ट्रस्टच्या अंतर्गत आयुष्यमान भारत – प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत आयुष्यमान कार्ड वाटप शिबीर आयोजित करण्यात आले असून, या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन सर्व नागरिकांना करण्यात आले आहे.





प्रधानमंत्री जनआरोग्य योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असून, या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. देशभरातील शासकीय तसेच निवडक खासगी रुग्णालयांमध्ये या कार्डच्या आधारे उपचार घेता येतात. मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी आयुष्यमान कार्ड असणे अनिवार्य आहे.

प्रभाग क्रमांक ७ मधील जास्तीत जास्त नागरिकांना या योजनेचा लाभ मिळावा, या उदात्त हेतूने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांना आरोग्यसेवांपासून वंचित राहावे लागू नये, तसेच गंभीर आजाराच्या वेळी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी नगरपरिषद सातत्याने प्रयत्नशील आहे. या शिबिराचे आयोजन ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून, प्रभाग क्रमांक ७ चे नगरसेवक सचिन सेठ सारडा व नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे लक्ष देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

सदर आयुष्यमान कार्ड वाटप शिबीर दि. ४ फेब्रुवारी ते दि. ६ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबीराचे ठिकाण श्री मारोती मंदिर, पद्मावती गल्ली, परळी वैजनाथ असे असून, शिबीराची वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत असणार आहे.

या शिबिरामध्ये पात्र नागरिकांचे आयुष्यमान कार्ड तयार करून देण्यात येणार असून, आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड व इतर आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

आरोग्य ही प्रत्येकाची मूलभूत गरज असून, शासनाच्या या महत्त्वाच्या योजनेचा लाभ प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचावा, यासाठी सर्व नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

# खाऊचे बंद पाकीट हे स्लो पॉयझन? दर्जाहीन खाऊचा ग्रामीण भागात विळखा; अन्न प्रशासनाकडे कारवाईची मागणी..

संतोष सानप आष्टी

**ग्रामीण भागातील किराणा दुकाने आणि टपऱ्यांवर सध्या हवाबंद प्लॅस्टिक पिशव्यांमधील खाद्यपदार्थांचा सुळसुळाट झाला आहे. मात्र, या पाकिटांवर उत्पादनाचा दिनांक किंवा ते कधी खराब होणार (Expiry Date), याची कोणतीही नोंद नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे उत्पादक आणि विक्रेते नियमांची पायमल्ली करून सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळत आहेत. ग्रामीण भागातील किराणा दुकानदार व इतर विक्रेते हे हा माल त्याच्याकडे येणाऱ्या सप्लायर किंवा शहरातून विक्रीसाठी आणतात. त्यामुळे माल घेताना जास्तीचा घेतात. ग्रामीण भागात हा माल वेळेत विकत नाही. परिणामी मालाचे एक्सपायरी डेट संपल्यानंतर देखील विक्री केला जातो. ब्रेड, पाव यांसारख्या पदार्थांची टिकण्याची क्षमता केवळ २४ ते ४८ तास असते. तरीही, ग्रामीण भागात हे पदार्थ आठ–आठ दिवस विकले जात आहेत. टोस्ट आणि खारी सारखे पदार्थ महिनाभर तसेच ठेवले जातात, ज्यामुळे त्यांना बुरशी लागण्याची किंवा ते कुबट होण्याची शक्यता असते. अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यानुसार, प्रत्येक पॅकबंद अन्नावर उत्पादकाचे नाव, परवाना क्रमांक आणि मुदतीचा उल्लेख असणे अनिवार्य आहे. मात्र, स्थानिक स्तरावर तयार होणाऱ्या चिप्स, कुरकुरे आणि फरसाणच्या पाकिटांवर असा कोणताही उल्लेख आढळत नाही. याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.**

### हवाबंद पाकिटातील पदार्थ आणि त्यांची टिकण्याची क्षमता



- **ब्रेड, पाव, हे बेकरी उत्पादने २ ते ३ दिवस टिकतात. यानंतर या पदार्थांना बुरशी लागते किंवा उग्र वास येतो. तळलेले पदार्थ चिप्स, कुरकुरे, रिंग्स ३ ते ४ महिने (जर योग्य दर्जाचे तेल असेल तर) तेलाचा कुबट वास येतो. फरसाण , शेव , लसूण शेव, गाठीया, फरसाण हे पदार्थ १ ते २ महिने टिकतात. नंतर मऊ पडणे, चव कडवट होते. टोस्ट, खारी, क्रीम रोल हे पदार्थ १५ ते ३० दिवस टिकतात. बर्फी, पेढे (खुले/पॅक) | ३ ते ५ दिवस टिकतात**

### ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विक्री होणारे पदार्थ ग्रामीण भागात ब्रँडेड

- **कंपन्यांऐवजी स्थानिक आणि स्वस्त मिळणाऱ्या उत्पादनांना पसंती दिली जाते, जिथे सुरक्षिततेचे नियम पाळले जात नाहीत. रंगीबेरंगी कुरकुरे आणि रिंग्स: अत्यंत स्वस्त आणि आकर्षक रंग असलेले हे पदार्थ मुलांमध्ये लोकप्रिय आहेत. यात अनेकदा हानिकारक रंगांचा (Synthetic Colors) वापर होतो. स्थानिक वेफर्स आणि पापड्या: तेलकट पिशव्यांमध्ये भरलेले हे पदार्थ अनेकदा हलक्या दर्जाच्या तेलात तळलेले असतात. क्रीम बिस्किटे आणि केक: स्वस्त दरात मिळणारे स्थानिक कंपनीचे केक, ज्यांच्या क्रीमची गुणवत्ता संशयास्पद असते. खारी आणि बटर: चहासोबत खाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरले जातात, पण त्यांचे पॅकिंग पूर्णपणे असुरक्षित असते.**

### तुम्ही काय करू शकता ?

- **ज्या पाकिटावर FSSAI नंबर आणि तारीख नाही, ते विकत घेऊ नका. आपल्या परिसरातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्याकडे किंवा FDA च्या टोल–फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवा.**

---

# जनहिताच्या कामांना प्राधान्य द्या, दर्जेदार कामे करून घ्या

## ना. पंकजाताई मुंडे यांनी दिला नवनिर्वाचित सभापतींना कानमंत्र

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

शहरातील सर्वसामान्य जनतेच्या कामांना प्राधान्य देऊन सर्व कामे दर्जेदार होतील आणि नागरिक समाधानी होतील याची काळजी घेऊन कामे करा, असा कानमंत्र देऊन सर्वांना पुढील जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी परळीच्या पालिकेतील भाजपच्या नवनिर्वाचित सभापतींना शुभेच्छा दिल्या. सभापतीपदाची संधी दिल्याबद्दल प्रा. पवन मुंडे, योगेश मेनकुदळे यांनी आज ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले.



प्रचारानिमित्त राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे या लातूर जिल्हा दौऱ्यावर असताना परळी वैजनाथच्या नगर पालिका बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे यांनी आज त्यांची भेट घेऊन सभापतीपद देऊन सन्मान केल्याबद्दल त्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार व्यक्त केले. यावेळी परळीच्या जनतेने नगरपालिका निवडणुकीत आपल्याला भरभरून प्रतिसाद दिला आहे. जनतेने दिलेल्या कौलाचा सन्मान होईल असे नगर पालिकेत काम करा. यावेळी पालिकेत आपल्याला तीन सभापतीपदे मिळाली आहेत. या पदाचा जनतेच्या सेवेसाठी उपयोग करा, असे सांगून सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून विकासकामे करण्यावर भर द्यावा असा कानमंत्र दिला.

शहराच्या विकासासाठी निधी आणण्याची जबाबदारी माझी आहे. मात्र त्या निधीचा योग्य ठिकाणी वापर होऊन जनहिताची कामे मार्गी लागतील हे पाहणे नगरसेवक आणि सभापतींचे काम आहे, असे सांगून दर्जेदार कामे करून घ्या, असा सल्लाही ना. पंकजाताई मुंडे यांनी दिला. यावेळी त्यांनी नवनिर्वाचित नगरसेवक आणि सभापतींना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी नितीन ढाकणे, भाजपाचे शहर सरचिटणीस तथा नगरसेवकपती प्रितेश तोतला, प्रविण फड आदी उपस्थित होते.

---

# नगर परिषद पंतप्रधान आवास योजना / रमाई घरकुल आवास योजनेतील लाभार्थ्यांना मोफत रेती उपलब्ध करुन द्यावी : कविता इंगळे

परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

नगर परिषद हद्दीतील मंजुर घरकुल शहरातील रहिवासी असून पंतप्रधान आवास योजना / रमाई घरकुल आवास योजनेचे लाभार्थी आहेत. त्यांना रेती उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्य कविता अनंत इंगळे यांनी निवेदनाद्वारे परळी वैजनाथचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. याबाबतची माहिती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे साहेब व नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी वहिनींना देखील निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सदरील लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झालेले असून बांधकाम सध्या सुरू आहेत तसेच काही प्रस्तावित आहेत. घरकुल बांधकामासाठी आवश्यक असलेली रेती खरेदी करणे लाभार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शक्य



होत नाही. शासन निर्णयानुसार घरकुल योजनांतील लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास रेती उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. परंतु अद्याप लाभार्थ्याला मोफत रेती मिळालेली नाही ही गंभीर बाब आहे. त्यामुळे घरकुल बांधकामासाठी नियमानुसार आवश्यक त्या प्रमाणात मोफत रेती मंजूर करून पुरवठा करण्यात यावा अशी आग्रही मागणी नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्य कविता अनंत इंगळे यांनी केली आहे.

---



# सिरसाळा येथे वंचित बहुजन आघाडीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा धनगर समाजाकडून सत्कार

सिरसाळा : प्रतिनिधी


सिरसाळा येथे वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित अध्यक्ष आकाश गायकवाड आणि उपाध्यक्ष अशोक फुके यांचा धनगर समाजाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. समाजातील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी धनगर समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते गोरख काळे, सुनीलभाऊ काळे तसेच दैनिक आरंभ चे पत्रकार बापू किरवले आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमादरम्यान समाजातील एकोपा, नेतृत्वाची गरज आणि स्थानिक प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याची भूमिका यावरही चर्चा करण्यात आली.

---

# कांचनाबाई जगतकर यांचे दुःखद निधन

**परळी प्रतिनिधी** – येथील वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रा. डॉ.विनोद जगतकर यांच्या मातोश्री श्रीमती कांचनाबाई गणपतराव जगतकर यांचे आज पहाटे साडेचार वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.आंबेडकरी चळवळीत त्यांचे मोठे योगदान होते. परळी येथील महिला महाविद्यालयाचे प्राध्यापक व वैद्यनाथ बँकेचे संचालक डॉ.विनोद जगतकर यांच्या मातोश्री श्रीमती कांचनबाई गणपतराव जगतकर यांचे आज दिनांक 3 नोव्हेंबर रोजी पहाटे अल्पशा आजाराने परळी शहरातील भिमनगर येथील राहत्या घरी दुखद निधन झाले.मृत्यू समयी त्या वय 85 वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुलं,पाच मुली सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. त्या सुरूवाती पासुन खुप मनमिळाऊ स्वभावाच्या, धार्मिक वृत्तीचा होत्या.



---

# डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी जिल्हाध्यक्षांना केले आवाहन

मुंबई /प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणाऱ्या वसंतराव काणे आर्दश तालुका पत्रकार संघ आणि रंगाअण्णा वैद्य आर्दश जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावा येत्या 22 फेब्रुवारी 2026 रोजी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री. एस.एम.देशमुख यांच्या अध्यतेखाली होत असुन या अभुतपूर्व सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हाध्यक्ष यांनी आप आपल्या जिल्हयाच्या ठिकाणी एक व्यापक बैठक घेऊन सर्वांना निमंत्रीत करावे. व सर्वांना सोबत घेऊन या सोहळ्यासाठी उपस्थित राहावे. असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



याबाबत अधिक वृत्त असे की,अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ आणि रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि राज्यातील तालुका अध्यक्ष यांचा मेळावा घेतला जातो. यावर्षी देखील रायगड जिल्ह्यातील कर्जत या तालुक्याच्या ठिकाणी येत्या रविवारी 22 फेब्रुवारी 2026 रोजी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. आदर्श तालुका पत्रकार संघ,आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व राज्यातील तालुका अध्यक्ष यांचा मेळावा या संदर्भात महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हाध्यक्षांनी आपल्या जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व तालुका अध्यक्षांना एकत्रित करावे. त्याचबरोबर त्यांची जिल्हा स्तरावर तातडीने एक व्यापक बैठक घेऊन या सोहळ्यासाठी उपस्थित राहण्यासाठी नियोजन करावे.अशा प्रकारचे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी सर्व जिल्हाध्यक्षांना केले आहे.

---

# "सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्यांना गोरगरिबांचे दुःख कसे कळणार" : आ. रमेशआप्पा कराड

काटगाव (लातूर) : प्रतिनिधी

काँग्रेस नेत्यांवर टीका करताना "सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्यांना सर्वसामान्य जनतेचे दुःख आणि वेदना कशा कळणार?" असा सवाल भाजपाचे नेते तथा आमदार रमेशआप्पा कराड यांनी काटगाव येथील जाहीर सभेत उपस्थित केला. शेतकरी, महिला आणि सर्वसामान्य घटकांच्या हितासाठी भाजपाला साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

काटगाव जि.प. गटातील उमेदवार पूर्वादेवी देशमुख, पंचायत समिती गणातील शितल लटपटे आणि समाधान पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी काँग्रेसवर विकासकामांतील कमिशनखोरीचे आरोप करत, "मी जर एक रुपया जरी खाल्ला असेल तर सिद्ध करा, मी आमदारकीचा राजीनामा देईन," असे खुले आव्हान दिले.

भाजप सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रस्ते व पायाभूत सुविधा उभारल्या गेल्याचा दावा करत कराड यांनी साखर कारखान्यांतील मक्तेदारीविरोधात लढा सुरूच राहील, तसेच शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे दर व सन्मान मिळवून



देण्यासाठी संघर्ष कायम ठेवू, असे सांगितले. लातूर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांवर भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले. सभेस स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

# नगर रायझिंग फाउंडेशन आयोजित हाफ मॅरेथॉनमध्ये धावले हजारो नगरकर

## तीन विभागात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, (NRM: Nagar Rising Marathon) 21, 10, 4K

अहिल्यानगर प्रतिनिधी

नगर रायझिंग फाउंडेशनने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत हजारो नागरिकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत जल्लोषात झाले.

स्पर्धेत २१ किलोमीटर मॅरेथॉनला नगर रायझिंग फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी, तर १० व ४ किलोमीटरच्या उद्योजिका रिंकू फिरोदिया हस्ते झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला.

यावेळी नगर रायझिंग फाउंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, नगर रायझिंगचे संचालक संदीप जोशी, 'सोहम ग्रुप'चे व्यवस्थापकीय संचालक अमित बुरा, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, नगर रायझिंगचे ट्रस्टी डॉ. सतीश सोनवणे, डॉ. श्याम तारडे, ॲड. गौरव मिरीकर, नगर छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आदी उपस्थित होते.

या मॅरेथॉन स्पर्धेत नगर जिल्ह्यातील क्रीडा प्रेमी नागरिकासह शेजारी जिल्ह्यातील ही नागरिकांनी सहभाग नोंदवत मॅरेथॉनचा आनंद लुटला. एकूणच यावेळी परिसरातील वातावरण अतिशय उत्साहवर्धक आणि लहान मोठ्या सर्वांच्याच उपस्थितीमुळे फुलून गेले होते.